# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १९ मार्च, २०२५ / फाल्गुन २८, १९४६ (शके)**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री**
**(३) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धव्यवसाय विकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री**
**(४) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री**
**(५) माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री**
**(६) परिवहन मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २१**

---

### पाचाड (जि.रायगड) येथील राजमाता जिजाऊ समाधीस्थळाचा विकास करण्याबाबत

**(१) * ६९ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचाड (जि.रायगड) येथील वन विभागाच्या अखत्यारित असलेल्या राजमाता जिजाऊ समाधीस्थळाची सद्य:स्थितीत दुरवस्था झाली असून, याठिकाणी येणाऱ्या पर्यटकांसाठी व शिवभक्तांसाठीच्या मूलभूत सेवासुविधा उपलब्ध नसल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू समाधीस्थळाचा विद्युत देयक भरणा करण्यात न आल्याने विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राजमाता जिजाऊ समाधीस्थळाचा विकास करून पर्यटकांसाठी मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे नाही.

अशा प्रकारची कोणतीही बाब निदर्शनास आली नाही.

(२) सदर समाधीस्थळ हे पूर्वी वन विभागाच्या अखत्यारीत होते. त्यामुळे वन विभागामार्फत राजमाता जिजाऊ समाधीस्थळाचा विद्युत देयकाचा भरणा करण्यात येत होता.सद्य:स्थितीत सदर स्मारक हे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ यांच्या अंतर्गत केंद्र सरंक्षित स्मारक आहे, आणि विद्युत पुरवठा देखील सुरळीत सुरू आहे.

(३) उक्त स्मारकाचे सौंदर्यीकरण व परिसर विकास आणि पर्यटक उपयुक्त सुविधा (स्वच्छतागृह, वाहनतळ सुविधा) उभारण्याचे कार्य रायगड विकास प्राधिकरण यांच्याकडून करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैजापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतील पात्र लाभार्थ्यांना अनुदान मिळण्याबाबत

**(२) * ७०९ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैजापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतील पात्र ३२८ लाभार्थ्यांना योजनेचा पहिला हप्ता मिळाला नसल्याची बाब दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विधानसभा निवडणूकीपूर्वी वैजापूर तालुक्यातील धनगर समाजाला घरकुल मिळण्यासाठी सादर करण्यात आलेले प्रस्ताव इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयामार्फत जिल्हाधिकाऱ्यांच्या समिती समोर सादर करुन त्यासाठी आवश्यक निधी शासनाने मंजूर केला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वैजापूर तालुक्यातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतील पात्र ३२८ लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी पहिल्या हप्त्याचा निधी त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२) व (३)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेंतर्गत तरतुदींनुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने प्रशासकीय मान्यता दिलेल्या प्रस्तावांना शासनस्तरावरुन कार्योत्तर मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील प्राप्त प्रस्तावांनुसार शासन निर्णय दिनांक २९/०७/२०२४ अन्वये २,८५९ आणि शासन निर्णय दिनांक ०८/१०/२०२४ अन्वये १,९५३ अशा एकूण ४,८१२ लाभार्थ्यांना कार्योत्तर मान्यता व त्यांकरीता एकूण रुपये ५८,६८,१४,४००/- इतक्या निधीस मंजुरी देण्यात आली आहे. सदरहू घरकुलांसाठी सद्य:स्थितीत एकूण रुपये ४.४० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून उर्वरित निधी योजनेंतर्गत उपलब्ध आर्थिक तरतुद आणि घरकुल बांधकामाच्या प्रगती टप्प्यानुसार देण्यात येणार आहे.

सदरहू ४,८१२ लाभार्थ्यांमध्ये वैजापूर तालुक्यातील ३२९ लाभार्थ्यांचा समावेश आहे. सदरहू ३२९ लाभार्थ्यांची नोंदणी आवास सॉफ्ट प्रणालीवर करण्यात आली असून त्यापैकी २४१ लाभार्थ्यांना मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. त्यापैकी १७१ लाभार्थ्यांना प्रथम हप्ता (रुपये १५,०००/-) वितरीत करण्यात आला असून उर्वरित लाभार्थ्यांची PFMS प्रणालीवर बँक खाते पडताळणी प्राप्त होताच पहिला हप्ता वितरीत करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात महानिर्मितीचे पाच संच बंद असल्याने विजेचा तुटवडा निर्माण होत असल्याबाबत

**(३) * २७९ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अंबादास दानवे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महानिर्मिती वीज कंपनीचे कोराडी येथील २, परळी येथील १, चंद्रपूर येथील २ वीज निर्मितीचे संच बंद असल्याने महानिर्मितीचे वीज उत्पादन कमी होवून राज्यात वीजेचा तुटवडा निर्माण होणार असल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानिर्मितीची एकूण १३ हजार २२० मेगावॅट क्षमता असताना सदरचे पाचही संच बिघडल्यामुळे त्याचा वीज निर्मितीवर परिणाम होऊन सध्या केवळ ६२८८ मेगावॅट इतक्या क्षमतेची वीज निर्मिती होत असल्याचे तसेच कोराडी येथील एका संचाचा हॉट एअर डक्ट (उष्ण हवेची नलिका) बंद पडल्याने ती दुरुस्त करून संच पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाजगी वीज निर्मिती करणाऱ्या कंपन्यांच्या वीज निर्मिती क्षमतेमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून राज्यामध्ये वाढत्या विजेच्या मागणीमुळे शासनाला खाजगी वीज कंपन्यांकडून जास्तीच्या दराने वीज खरेदी करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, खाजगी वीज कंपन्यांचा फायदा होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडून शासनाच्या मालकीच्या असलेल्या वीज केंद्राच्या देखभाल व दुरुस्ती मध्ये जाणिवपूर्वक दिरंगाई करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील वीज पुरवठा करण्यासाठी महत्वाचे असलेले महानिर्मितीचे संच सुरु करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत तसेच वीज केंद्राच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामामध्ये दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

खालील नमूद वीज निर्मिती संच तांत्रिक कारणास्तव बंद पडले होते. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

कोराडी संच क्र.८ दिनांक ३/०१/२०२५ पासून दिनांक ५/०१/२०२५ पर्यंत

कोराडी संच क्र.९ दिनांक ३०/१२/२०२४ पासून दिनांक २०/०१/२०२५ पर्यंत

परळी संच क्र.७ दिनांक ३/०१/२०२५ पासून दिनांक ६/०१/२०२५ पर्यंत

चंद्रपूर संच क्र.४ दिनांक २/०१/२०२५ पासून दिनांक १६/०१/२०२५ पर्यंत

चंद्रपूर संच क्र.६ दिनांक १४/१२/२०२४ पासून दिनांक १९/०२/२०२५ पर्यंत

उपरोक्त सर्व संच उक्त कालावधीत दुरुस्तीची कामे पूर्ण करुन संच कार्यान्वित केलेले आहेत.

(२) महानिर्मिती कंपनीची एकूण स्थापित क्षमता १३२२० मेगावॅट इतकी असून त्यापैकी औष्णिक वीज निर्मिती क्षमता ९५४० मेगावॅट इतकी आहे. महानिर्मितीच्या औष्णिक वीज निर्मिती केंद्राद्वारे मेरिट आर्डर डिस्पेच मध्ये बसणारी व औष्णिक भारांक (PLF- Plant Load Factor) ६९.९% प्रमाणे माहे जानेवारी, २०२५ मध्ये सरासरी ६६६८ मेगावॅट इतकी वीजनिर्मिती झालेली आहे. महानिर्मितीच्या सर्व स्त्रोतापासून एकत्रित ७४४९ मेगावॅट इतकी वीजनिर्मिती झालेली आहे.

दिनांक ३०/१२/२०२४ रोजी बंद पडलेला कोराडी येथील संच क्र. ०९ च्या हॉट एयर डक्ट ची दुरुस्ती करून दिनांक २०/०१/२०२५ रोजी (३ आठवड्यातच) सदर संच पुन्हा कार्यान्वित करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

महावितरण कंपनीद्वारे राज्याची वीजेची मागणी ही करारानुसार वीज निर्मिती प्रकल्पांमधून MoD (Merit Order Dispatch) तत्वावर वीज खरेदी करुन पूर्ण केली जाते. अतिरिक्त वीजेची गरज भासल्यास गरजेनूसार कोयना जलविद्युत संच योग्य क्षमतेने चालवून व खुल्या बाजारातून आवश्यकतेनूसार वीज खरेदी करुन वीजेची मागणी पूर्ण करण्यात येते.

(४) हे खरे नाही.

तांत्रिक कारणास्तव बंद पडलेल्या सर्व संचांची दुरुस्तीची कामे शीघ्रगतीने पूर्ण करून सदर संच कार्यान्वित केले आहेत.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) येथील गुन्हेगारांना मानसिक रुग्ण असल्याची प्रमाणपत्रे दिल्याबाबत

**(४) * २९३ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील विशाल गवळी व अन्य पाच ते सहा गुन्हेगारांनी मानसिक रुग्ण असल्याची प्रमाणपत्रे मिळवून विनयभंग, छेडछाड अशा गंभीर गुन्हयात जामीन मिळविला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका अल्पवयीन तरुणीवर लैगिंक अत्याचार करुन तिची हत्या करणारा आरोपी विशाल गवळी मानसिक रुग्ण असलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे यापूर्वीही जामीन मिळवून गुन्हा केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने गंभीर गुन्हयातील आरोपींना प्रमाणपत्र देणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कठोर कारवाई करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही,

आरोपी विशाल गवळी यांचेवर विनयभंगाचे व इतर असे एकूण ८ गुन्हे कोळसेवाडी पोलीस स्टेशन येथे दाखल आहेत.

सदर गुन्ह्यात आरोपी विशाल गवळी व अन्य पाच ते सहा गुन्हेगारांनी मानसिक रुग्ण असल्याचे प्रमाणपत्रा आधारे विनयभंग, छेडछाड अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये जामीन मिळविल्याचे तपासाअंती आढळून आलेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पोलीस आयुक्तालय तसेच कारागृह विभागात अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेली पदे वगळल्याबाबत

**(५) * २२३ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गृह विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या पोलीस आयुक्तांलयाच्या आस्थापनेवरील अनुसूचित जमाती प्रवर्गातील एकूण ३८० पदांचा अनुशेष शिल्लक असून अधिसंख्य पदावर ३८० जणांना वर्ग केल्यानंतर सदर पदे रिक्त दाखविण्यात आलेली नसल्यामुळे अनुसूचित जमातीची ३८० राखीव पदे कमी होण्याची शक्यता आहे, तसेच कारागृह विभाग, पुणे यांच्या अखत्यारित ९ मध्यवर्ती कारागृहे, ३१ जिल्हा कारागृहे, १९ खुली कारागृहे, १ खुली वसाहत आणि १७२ दुय्यम कारागृहांचा समावेश असून कारागृह विभागातील अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेली 'वर्ग-१, वर्ग-२ व वर्ग-४' ची पदे वगळण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कारागृह विभाग, पुणे येथे गट ‘अ’ ते गट ‘ड’ संवर्गात एकूण मंजूर ५ हजार ६४ पदे असून गट ‘क’ संवर्गातील अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या १५८ पदांपैकी केवळ १३५ पदे भरलेली आहेत तसेच अनुसूचित जमातींच्या राखीव जागेवर नियुक्त झालेल्या व नंतर जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेल्या १५ अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे रिक्त दाखविण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कारागृह विभागातून अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेली ‘वर्ग-१, वर्ग-२ व वर्ग-४’ ची पदे तात्काळ भरण्याबाबत तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयानुसार अंमलबजावणी करून अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची १५ पदे रिक्त दाखविण्याबाबत तसेच अनुसूचित जमातींची ३८० राखीव पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही,

राज्य पोलीस दलाच्या अखत्यारितील सर्व पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील अनुसूचित जमाती प्रवर्गाचे दावे अवैध ठरलेल्या ८०० पोलीस अधिकारी /कर्मचारी / लिपिक यांना अधिसंख्य पदांवर वर्ग करण्यात आले आहे. एकूण ७७३ अधिसंख्य पदे निर्माण झाली असून उर्वरित २७ अधिसंख्य पदे निर्माण करण्याची कार्यवाही सुरू आहे.

मूळ संवर्गातील सदरची ७७३ पदे रिक्त दाखवण्यात आली असून त्यापैकी ५८२ पदे ही सरळसेवा / पदोन्नतीने भरली असून उर्वरित १९१ पदे सरळसेवा / पदोन्नतीने भरण्यात येणार आहेत.

कारागृह विभागातील अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेली वर्ग-१, वर्ग-२ व वर्ग-४' ची पदे वगळण्यात आलेली नाहीत.

(२) व (३) हे खरे नाही.

कारागृह विभागात गट- अ ते ड संवर्गात एकूण ७०६८ मंजूर पदे आहेत. गट- क संवर्गात अनुसूचित जमातीसाठी ३५२ पदे राखीव आहेत. त्यापैकी १८२ पदे भरली असून १७५ पदे रिक्त आहेत.

कारागृह विभागातील गट-क संवर्गातील ०२ कारागृह शिपाई यांचे अनु. जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आली असून ०७ कर्मचारी यांचे प्रस्ताव जातवैधता पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. त्यामुळे अधिसंख्य पदे अद्याप निर्माण करण्यात आली नाही. त्यामुळे अनुसूचित जमातीसाठी राखीव पदे भरती प्रक्रियेतून वगळण्यात आलेली नाहीत. सदर पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. वर्ग-१ व वर्ग-२ या संवर्गामध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गाचे दावे अवैध ठरल्याबाबतचे प्रकरण नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हरिहरेश्वर (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) पर्यटन स्थळाचा विकास करण्याबाबत

**(६) * ९९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हरिहरेश्वर (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) हे प्रसिध्द धार्मिक व पर्यटन स्थळ असून दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या ठिकाणी मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे येथे येणाऱ्या पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोळाव्या शतकात बांधलेले हरिहरेश्वरचे प्राचीन मंदिर टेकड्यालगत असल्याने मंदिर परिसरातील ठिकठिकाणी केलेल्या कामाची अत्यंत दुरवस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हरिहरेश्वर या पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी व दुरुस्तीच्या कामासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) व (२) होय, अंशत: खरे आहे.

(३) हरिहरेश्वर या पर्यटन स्थळाच्या विकासाकरीता पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, दिनांक ३१/०१/२०२२ रोजी रुपये २१७.०२ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच जिल्हा नियोजन समिती, रायगड यांचे मार्फत सदर पर्यटन स्थळास रुपये ६५.०० लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस आगार व स्थानक पुनर्विकास व दुरूस्तीच्या निविदांबाबत

**(७) * ६६९ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या स्थापत्य खात्याने मागील वर्षभरात बस आगार व स्थानकांच्या पुनर्विकास व दुरुस्तीच्या निविदा नियमबाहय पध्दतीने मंजूर केल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाच्या वित्तीय सल्लागारांनी असे प्रस्ताव अचानक सादर केल्याबाबत नापसंती व्यक्त केली असून, सन २०२४ मध्ये संचालक मंडळासमोर स्थापत्य खात्याने किती नियमित प्रस्ताव सादर केले व किती प्रस्ताव लेखा खात्याची मान्यता न घेता सादर केले आहेत,

(३) असल्यास, उक्त सादर केलेल्या प्रस्तावाची तसेच नियमबाहय पध्दतीने मंजूर केलेल्या निविदेची व अनियमिततेची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) नाही.

(२), (३) व (४) सन २०२४ मध्ये संचालक मंडळासमोर स्थापत्य खात्याने एकूण २९ प्रस्ताव सादर केले. त्या पैकी ६ प्रस्ताव हे आर्थिक बाबींशी संबंधित नसल्यामुळे त्यास लेखाखात्याची मान्यता घेण्यात आली नाही.

-----------------

## पुणे शहरातील मसाज पार्लरमध्ये अनैतिक व्यापार करण्यात येत असल्याबाबत

**(८) * ११२३ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वारगेट (जि.पुणे) येथे तरुणींना पैशांचे आमिष दाखवून मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्या व्यवसाय सुरु असल्याचा प्रकार पोलिसांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरात मागील वर्षभरात अशाप्रकारे गैरकृत्य सुरू असून सदर अनैतिक व्यापार करणाऱ्या किती मसाज सेंटरवर पोलीस विभागाने कारवाई केली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुणे शहरात मसाज सेंटर मध्ये सुरू असणाऱ्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलांबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सदर प्रकरणी स्वारगेट पोलीस स्टेशन, पुणे येथे गु.र.क्र.०३/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १४३(३), ३(५) सह अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३, ४, ५ अन्वये दिनांक ०४/०१/२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) व (३) पुणे शहरात पोलीस विभागाकडून सन २०२४ मध्ये २५ व सन २०२५ मध्ये ०६ असे एकूण ३१ अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या मसाज सेंटरवर कारवाई करण्यात आली असून, सदर मसाज सेंटरमध्ये चालणाऱ्या अनधिकृत व्यवसायास प्रतिबंध घालण्यासाठी भारतीय न्याय संहिता कलम १४३, १४४ व पिटा कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात आरे व महानंदाने वितरित केलेल्या स्टॉलसंदर्भातील धोरण आखण्याबाबत

**(९) * १२०१ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात शासकीय डेअरी आणि महानंदसारखे दूध संघ आणि सर्व जिल्हा दूध संघाचे व्यवस्थित व्यवस्थापन होत नसल्याने सदरचे दुध संघ, आरे व महानंदच्या डेअरी बंद झाल्याने मुंबई व राज्यात अन्य ठिकाणी वितरित करण्यात आलेल्या दुध संघ स्टॉलचा उपयोग अन्य वस्तू विक्रीसाठी केला जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त स्टॉलधारकांनी हे स्टॉल इतरांना चालविण्यासाठी दिल्यामुळे स्थानिकांना बेरोजगारीला सामोरे जावे लागत असून सदर स्टॉलधारकांच्या वारसांना व स्थानिकांना या स्टॉलचे वितरण करुन एका स्टॉलवर किमान २ स्थानिकांना रोजगार देण्याबाबत शासन धोरण निश्चित करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सध्या बाजारात दूध आणि दुधापासून बनविण्यात येणारी अनेक उप उत्पादने असतानाही शासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने राज्यातील आरे दूध डेअरी, महानंद दुध संघ पुन्हा सुरु करण्याबाबत तसेच नव्याने आकृतिबंध तयार करून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय दिनांक ११/११/२००२ अन्वये शासनाचा दुग्धव्यवसायातील सहभाग टप्याटप्याने कमी करुन सहकारी दुध संघ व सहकारी दुध संस्था यांना चालना देण्यासाठी धोरण अवलंबिले आहे. त्यास अनुसरुन आरे स्टॉलमध्ये पूर्वी शासनाचे दुध व दुग्धजन्य पदार्थ विकण्याचे बंधनकारक होते. परंतु शासनाचे दूध उत्पादन कमी होत गेल्याने स्टॉल धारकांच्या उदरनिर्वाहाच्या दृष्टीने शासन पत्र दिनांक २९/०७/२०२२ व दिनांक २९/०३/२०२३ अन्वये आरे केंद्रावर इतर सहकारी व व्यवसायिक संस्थांचे दुध व दुग्धजन्य पदार्थ विक्री करण्याची परवानगी दिलेली आहे. त्यानुसार मुंबईतील आरे अंतर्गत वरळी/कुर्ला/गोरेगाव येथील १५१९ स्टॉल कार्यान्वित आहेत. छत्रपती संभाजी नगर विभागामध्ये एकूण १६ अनुक्रमे छत्रपती संभाजी नगरमध्ये ८, परभणी २, नांदेड ४, लातूर २ आरे सरिता स्टॉल कार्यान्वित आहेत. कोकण विभाग १, नाशिक विभाग १०, पुणे विभाग १३४ आणि नागपूर विभागात ३५ आरे स्टॉल कार्यान्वित आहेत.

दुग्धव्यवसाय विकास विभागामार्फत स्टॉल तपासणी पथके तयार करण्यात येतात व आरे स्टॉलची पथकांमार्फत तपासणी करण्यात येते. स्टॉल धारकांनी अन्य वस्तु विक्रीसाठी ठेवल्या असल्याचे आढळून आल्यास, अशा स्टॉल धारकांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

शासन धोरणानुसार स्थानिक नागरिकांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आरे स्टॉल चालविण्यासाठी परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार मागील ४० ते ५० वर्षापासून स्टॉल धारक दुध व दुग्धजन्य पदार्थ विक्री करुन उपजीविका भागवित आहेत. दुग्धव्यवसाय विकास विभागामार्फत स्टॉल तपासणी पथके तयार करण्यात येतात व आरे स्टॉलधारकांची पथकांमार्फत तपासणी करण्यात येत असते. तपासणीमध्ये स्टॉलधारक दोषी आढळल्यास दोषी स्टॉल धारकाचे स्टॉल शासन नियमानुसार सील बंद करण्यात येते.

(३) "महानंद" या दूध क्षेत्रातील शिखर संस्थेची ढासळलेली आर्थिक स्थिती विचारात घेता, सदर संस्थेचे पुन:रूज्जीवन राष्ट्रीय स्तरावरील प्रख्यात संस्था "राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ" मार्फत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. महानंदचे व्यवस्थापन सन २०२४-२५ ते २०२८-२९ या पाच वर्षासाठी राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाकडे देण्यात आलेले असून यासाठी रुपये २४८.८३ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. यापैकी रुपये १७३.६८ कोटी इतका निधी दिनांक ०७/०३/२०२५ पर्यंत शासनाद्वारे वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विद्यानगर (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांची सुविधांअभावी गैरसोय होत असल्याबाबत

**(१०) * १३७० श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यानगर (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील मूकबधिर मुलांच्या शाळेचे बांधकाम प्रलंबित असून सदर शाळा भाडेतत्वावर सूरू असल्याने विद्यार्थ्यांना देय असणाऱ्या सोयी सुविधा मिळत नसल्याने, उक्त सुविधांअभावी विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यानगर (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील मूकबधिर मुलांच्या शाळेच्या इमारतीचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मूकबधिर शाळेची शासकीय इमारत नादुरुस्त झाल्याने सन २०१९ पासून भाडेतत्वावर बंगला भाड्याने घेऊन त्याठिकाणी शाळा सुरु आहे. याठिकाणी विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने CCTV कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे अध्यापनासाठी स्वतंत्र वर्गखोली उपलब्ध आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याचे दिसून येत नाही.

(२) विद्यानगर (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील शासकीय मूकबधिर विद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी रायगड जिल्हा परिषद, अलिबाग च्या दिनांक १७/११/२०२१ च्या सर्वसाधारण सभेत रूपये २,४५,५६,१५०/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून, सदर निधी ५% दिव्यांग अनुशेषातून खर्च करण्यात येत आहे.

याअंतर्गत बांधकाम विभागाकडून ई-निविदा होऊन, कार्यारंभ आदेश निर्गमित केलेले आहेत. सद्य:स्थितीत इमारतीच्या पहिल्या मजल्यापर्यंतचे RCC काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित काम हे प्रगतीपथावर असून, डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण करण्याचा बांधकाम विभागाचा प्रयत्न आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंजवडी (पुणे) येथील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधील सामाईक सांडपाणी प्रकल्पामुळे जल प्रदूषण होत असल्याबाबत

**(११) * १३८९ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंजवडी (पुणे) येथील राजीव गांधी इन्फोटेक पार्क मधील सामाईक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातील सांडपाणी मुळा नदीत थेट सोडल्यामुळे प्रदूषित झालेल्या मुळा नदीतील माशांचा मृत्यू झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पात अनेक त्रुटी असल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आयटी पार्कला नोटीस बजाविली असून जल प्रदुषणास कारणीभूत असणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) प्रश्नाधीन विषयाबाबतची बातमी स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती.

(२) व (३) सदर बातमीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान पार्क टप्पा क्र. १ येथील सामाईक सांडपाणी प्रकल्पाची पाहणी करण्यात आली होती.

• सदर पाहणीदरम्यान आढळून आलेल्या विविध त्रुटींच्या अनुषंगाने सदर सामाईक सांडपाणी संचलन करणाऱ्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास दिनांक ०८/११/२०२४ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले आहेत. तसेच दिनांक ०३/०३/२०२५ रोजी वैयक्तिक सुनावणी घेऊन दिनांक ०४/०३/२०२५ रोजी अंतरीम निर्देश देण्यात आले आहेत.

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फ़त सदर सामाईक सांडपाणी प्रकिया प्रकल्पाची दिनांक ०४/०३/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान सदर प्रकल्पाने आवश्यक सुधारणा केले असल्याचे निर्दशनास आले आहे.

-----------------

## उमर्टी (ता.चोपडा, जि.जळगाव) येथे अवैधरित्या शस्त्र तस्करी करण्यात येत असल्याबाबत

**(१२) * १५९० श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवरील उमर्टी (ता.चोपडा, जि.जळगाव) येथे मोठ्या प्रमाणावर गावठी कट्टे विक्रीचा व्यवसाय बऱ्याच वर्षांपासून करण्यात येत असून, राज्याची सीमा अवैध धंद्याचे केंद्र बनले आहे, अवैध धंदे करणाऱ्यांवर कारवाई करणे संदर्भात माजी महानगर अध्यक्ष यांनी पोलीस अधीक्षक जळगाव यांचेकडे दिनांक १७/०२/२०२५ रोजी वा त्यादरम्यान तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासंदर्भात तसेच अवैध शस्त्र तस्करी, गुन्हेगारी रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नाही, हे खरे नाही.

अवैध धंदे करणाऱ्यांवर कारवाई करणे संदर्भात माजी महानगर अध्यक्ष यांनी पोलीस अधीक्षक, जळगाव यांचेकडे दिनांक १७/०२/२०२५ रोजी वा त्यादरम्यान कोणतीही तक्रार दाखल केल्याचे आढळून येत नाही.

(२) मध्यप्रदेश राज्याच्या सीमेलगत असलेल्या जळगांव जिल्ह्यातील चोपडा उपविभागातील चोपडा ग्रामीण, चोपडा शहर व अडावद पोलीस स्टेशनला जानेवारी २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत अवैध अग्निशस्त्र तस्करी करणाऱ्या आरोपींची गोपनीय माहिती काढून २७ गुन्हे दाखल करुन ५८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर आरोपींकडून ५० गावठी कट्टे, १ रिकामी मॅग्झीन व १०६ जिवंत काडतूस असा एकूण रुपये १५,०२,००० /- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक ०२/०३/२०२४ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, चोपडा उपविभाग, चोपडा ग्रामीण पोलीस ठाणे येथील नेमणुकीचे अधिकारी, अंमलदार यांच्यामार्फत संयुक्तपणे कोंबिंग ऑपरेशन राबवून अवैध अग्निशस्त्र निर्मिती करणारे रेकॉर्डवरील गुन्हेगारांच्या घरझडत्या घेण्यात आल्या आहेत.

तसेच दिनांक २०/०३/२०२४, दिनांक २७/०३/२०२४, दिनांक १६/०४/२०२४, दिनांक २६/०४/२०२४, दिनांक २५/१०/२०२४, दिनांक २७/१०/२०२४ व दिनांक १६/०२/२०२५ रोजी जळगांव जिल्हा पोलीस, स्थानिक गुन्हे शाखा जळगांव व धुळे जिल्हा पोलीसांनी वेळोवेळी संयुक्तिकरित्या अचानकपणे छापा मारुन कोंबिंग ऑपरेशन राबवून अवैध अग्निशस्त्र निर्मिती करणारे रेकॉर्डवरील गुन्हेगारांच्या घरझडत्या घेतल्या असता त्यात शिरपूर, ता.शिरपूर, जि.धुळे यांचेकडील NBW वॉरंटमधील दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

जळगांव जिल्ह्यात अवैध शस्त्र तस्करी करणारे तसेच अवैध शस्त्र बाळगणारे आरोपींवर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-

| वर्ष | दाखल गुन्हे | अटक आरोपी | जप्त पिस्तूल | जप्त काडतूस | एकूण मुद्देमाल जप्त |
|---|---|---|---|---|---|
| २०२४ | ६८ | १०७ | १०४ | १७३ | २६,७१,३००/- |
| २०२५ | १४ | २६ | १८ | ५१ | ४,५७,८००/- |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पोलीस उपनिरीक्षक या पदाची पूर्व परिक्षा पास झालेल्या उमेदवारांना मुख्य परिक्षेसाठी अपात्र ठरविण्यात आल्याबाबत

**(१३) * १६२७ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) ६१५ पदाकरीता दिनांक १० डिसेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास पूर्व परीक्षा घेवून त्याचा निकाल दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी जाहीर केला परंतु पूर्व परीक्षा पास केलेल्या ३०० उमेदवारांना वयोमर्यादा झाली असे सांगून मुख्य परिक्षेसाठी बाद ठरविण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने अन्य विभागाकरीता कोविड-१९ नंतर सरळसेवा भर्तीकरीता वयोमर्यादा २ वर्षाने शिथिल करण्याचे आदेश जाहीर केले होते, परंतु पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) भर्तीकरीता हा नियम नसल्याने उक्त उमेदवारांना नियमाचा फायदा मिळण्यासाठी प्रयत्न करुनही अद्याप त्यांना यश मिळालेले नाही याकरीता राज्य शासनाच्या इतर विभागानुसार २ वर्षाची वयोमर्यादा उमेदवारांना वाढवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे.

कमाल वयोमर्यादेपेक्षा अधिक वय असलेल्या २४६ उमेदवारांना वगळून उर्वरीत उमेदवारांचा निकाल महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक २९/०८/२०२४ रोजी जाहीर केला आहे.

(२) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०३/०३/२०२३ व दिनांक २०/१२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सरळसेवेने नियुक्ती संदर्भात प्रसिध्द होणाऱ्या सर्व जाहिरातींकरीता कमाल वयोमर्यादेत अनुक्रमे २ वर्षे व १ वर्ष इतकी शिथीलता देण्यात आली आहे. तथापि,पोलीस उपनिरीक्षक मर्यादीत विभागीय स्पर्धा परीक्षा ही सरळसेवेची परीक्षा नसून पोलीस दलामध्ये कार्यरत असणाऱ्या पोलीस अंमलदारांकरीता पोलीस उपनिरीक्षक पदासाठी घेण्यात आलेली मर्यादीत विभागीय परीक्षा पदोन्नतीसाठी होती. त्यामुळे सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त शासन निर्णयान्वये सरळ सेवेसाठी देण्यात आलेली कमाल वयोमर्यादेमधील शिथीलता सदरहू पदोन्नती परीक्षेसाठी लागू ठरत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत

**(१४) * १८३५ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, वेळेत वेतन मिळावे, वार्षिक वेतनवाढीचा वाढीव दर व थकबाकी मिळावी इत्यादी मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांनी दिनांक १३ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास विभागीय कार्यालयासमोर उपोषण/आंदोलन सुरु केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये सेवा ज्येष्ठता न पाहता अनुक्रमे पाच हजार, चार हजार व अडीच हजार रुपये अशी वेतनवाढ करण्यात आल्यामुळे वेतनात विसंगती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचे आर्थिक प्रश्न, वेतनवाढीतील त्रुटी व शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता अशा विविध समस्या सोडविण्यासाठी शासनाने दिनांक ४ ऑक्टोबर, २०२३ रोजी त्रिसदस्यीय समिती नेमून कर्मचाऱ्यांच्या समस्याच्या निराकरणासाठी दोन महिन्याचा कालावधी दिला होता, परंतु सदर कालावधी संपूनही सद्यःस्थितीत कर्मचाऱ्यांचे विविध आर्थिक प्रश्न प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या उक्त मागण्या तसेच विविध समस्या सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) एसटी कर्मचाऱ्यांचे आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी नेमण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीने सादर केलेल्या अहवालानुसार तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये रा.प. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनामध्ये सरसकट रुपये ६५०० वाढ देण्यात आली असून दिनांक ०१/०४/२०२० पासून मूळ वेतन निश्चिती करण्यात आलेली आहे. दिनांक ०१/०४/२०२४ पासून वेतनाची थकबाकी माहे सप्टेंबर २०२४ पेड ऑक्टोबर २०२४ पासून ५ समान हफ्त्यात अदा करण्यात आलेली आहे.

-----------------

## मुंबईसह ठाणे येथील हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१५) * ६५ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील विविध बांधकामे, मेट्रो आणि कोस्टल रोड प्रकल्पांमुळे, रेड झोनमध्ये येणारे उद्योग आणि बेकरींमुळे तसेच दरवर्षी दिवाळीनंतर मुंबईतील अनेक विभागांतील हवा प्रदूषणामध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून, हवेची गुणवत्ता खालावल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याची गंभीर बाब दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत काही दिवसांपासून राज्यातील हवेचे प्रदूषण वाढले असून हवेचे २२ शहरांमधील हवा प्रदूषित असल्याचे निदर्शनास आले आहे त्यापैकी ७ शहरातील हवेची गुणवत्ता अतिशय खराब असून आरोग्यासाठी अपायकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हवेच्या प्रदूषण नियंत्रणासाठी असलेल्या नियमावलीचे पालन करण्याबाबत ठाणे येथील २९७ बांधकाम व्यावसायिकांना नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त दोषी बांधकाम व्यावसायिकांविरुध्द कडक कारवाई करण्याबाबत तसेच तत्कालीन शासनाने प्रदूषण कमी करण्यासाठी सुरु केलेल्या स्वच्छता अभियानासाठी खरेदी केलेल्या विविध साहित्यासाठी सुमारे ५०० कोटी रुपये खर्च करुनही प्रदुषणात वाढ होत असल्याने हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी व हवेची गुणवत्ता वाढविण्याबाबत व वाढत्या प्रदूषणाला कायमस्वरूपी प्रतिबंध करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे. तथापि, मुंबई, मुंबई उपनगरे, नवी मुंबई, ठाणे या परिसरातील हवेचा दर्जा माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०२४ मध्ये हवा गुणवत्ता निर्देशांकानुसार मध्यम स्तराचा होता.सार्वजनिक आरोग्य विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दिनांक २८/०२/२०२५ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार मुंबई शहर आणि उपनगरातील दवाखान्यांमध्ये नोंद झालेल्या श्वसन विकाराचा दमा, खोकला, इ. आजाराच्या रुग्ण संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे आढ़ळून येत नसल्याचे नमूद केले आहे. तसेच, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडून दिनांक ०४/०३/२०२५ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार नागरिकांच्या आरोग्याबाबत तक्रार प्राप्त झालेल्या नाहीत.
(२) हे अंशत: खरे आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने राज्यामध्ये ६९ ठिकाणी बसविलेल्या स्वयंचलित सतत वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी केंद्रांच्या (CAAQMS) अहवालानुसार राज्यातील हवा अतिशय वाईट असल्याचे निदर्शनास आलेले नाही.तथापि, माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये मोजक्या ठिकाणी काही दिवशी हवा खराब असल्याचे दिसून आले होते.
(३) हे खरे आहे. ठाणे महानगरपालिकेच्या दिनांक २४/०२/२०२५ रोजीच्या अहवालानुसार ठाणे महानगरपालिकेने २९७ बांधकाम व्यवसायिकांना हवेची गुणवत्ता योग्य राखण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तयार केलेल्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करण्यासाठी नोटिस दिलेल्या आहेत.
(४) मुंबई शहर व परिसरातील हवा प्रदूषणाबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी स्वहीत याचिका क्र.३/२०२३ मध्ये पारीत केलेल्या आदेशांच्या अनुषंगाने मुंबई महानगर परिसरातील हवा प्रदूषण नियंत्रणाकरीता उपाययोजना करण्याकरीता आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने दिनांक ०५/०२/२०२४ रोजी समन्वय समिती स्थापन केलेली आहे. सदर समितींच्या शिफारशींनुसार हवा प्रदूषणाला आळा घालण्याकरीता विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.
• तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक २५/०२/२०२५ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार नियमांचे पालन न करणाऱ्या बांधकाम प्रकल्पांना प्रारंभी लेखी सूचना (Intimation), दिल्यानंतर 'कारणे दाखवा नोटीस' आणि 'काम थांबवण्याची नोटीस या विभागामार्फत देण्यात येतात. ०१ ऑक्टोबर, २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ पर्यंत सुमारे १२३५ ठिकाणी 'काम थांबवण्याची नोटीस' देण्यात आली असून सदर कार्यवाही सातत्याने सुरू आहे.
• ठाणे महानगरपालिकेच्या दिनांक २१/०२/२०२५ रोजीच्या अहवालानुसार ठाणे महानगरपालिकेने २९७ बांधकाम व्यवसायिकांना हवेची गुणवत्ता योग्य राखण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तयार केलेल्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करण्यासाठी नोटिस दिलेल्या आहेत. त्यातील १८२ बांधकाम व्यवसायिकांवर दंडात्मक कारवाई करुन रुपये १३.५० लक्ष दंड आकारला आला असून ३९ व्यवसायिकांना स्टॅाप वर्क का देण्यात येऊ नये, या बाबत आदेश देण्यात आले आहेत. उर्वरित ७

व्यवसायिकांना स्टॉप वर्कची नोटीस देण्यात आली असून, त्यापैकी ३ व्यवसायिकांना नोटीसीची पूर्तता केल्यामुळे स्टॉप वर्क नोटिस मागे घेण्यात आलेल्या आहेत व ४ व्यवसायिकांची नोटीस कायम ठेवण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंधेरी (मुंबई) येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून बनावट वाहन परवाने दिल्याप्रकरणी चौकशी करण्याबाबत

**(१६) * ६३४ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये महालेखापाल यांनी (Accountant General Audit) सन २०२३-२०२४ चे लेखापरिक्षण करतेवेळी ७६,००० हजार वाहन चालविण्याचे बनावट परवाने दिल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहन चालविण्याच्या बनावट परवान्यांची चौकशी करण्यासाठी स्थापन केलेल्या एस.आय.टी समितीने परिवहन आयुक्तांकडे सादर केलेल्या चौकशी अहवालात दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबतचा अहवाल परिवहन आयुक्तांनी, परिवहन विभागाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एस.आय.टी. समितीने सादर केलेल्या अहवालात दोषी आढळलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अंधेरी येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील ७६,००० बनावट वाहन परवाने दिल्याप्रकरणी दोषी आढळलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना निलंबित करुन त्यांच्याविरुध्द गुन्हे दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) मा.महालेखाकार (लेखा-II), नागपूर, महाराष्ट्र राज्य यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम) कार्यालयाच्या सन २०२३-२०२४ च्या लेखापरिक्षणाच्या वेळी सदर कार्यालयामध्ये बनावट ड्रायव्हिंग टेस्टवर सुमारे ७६,००० ड्रायव्हिंग परवाने जारी केले असावेत असा आक्षेप घेतला आहे.

(२) होय.

(३) (४) व (५) सदर प्रकरणी १ सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी व १ मोटार वाहन निरीक्षक यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ अन्वये विभागीय चौकशी सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

-----------------

## राजगुरुनगर (जि.पुणे) व कल्याण (पू) येथील अल्पवयीन मुलींवर अत्याचार करुन हत्या केल्याबाबत

**(१७) * ६३९ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजगुरुनगर (जि.पुणे) येथील बेपत्ता झालेल्या दोन अल्पवयीन बहिणींची हॉटेलच्या वेटरने अत्याचार करुन हत्या केल्याचे तसेच कल्याण (पू) मध्ये देखील अल्पवयीन मुलीचे अपहरण करुन तिच्यावर अत्याचार करुन हत्या केल्याची घटना माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही प्रकरणी आरोपींना अद्यापही अटक केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राजगुरुनगर (जि.पुणे) येथील अल्पवयीन मुलींवर अत्याचार करणाऱ्या आरोपींना अटक करून दोषींविरुध्द कठोर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) राजगुरुनगर (जि.पुणे) येथील खेड पोलीस स्टेशन, पुणे येथे गु.र.क्र.७०३/२०२४, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७(२), १०३(१), ६४(२)(आय), ६५, ९६, १२७(२) सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ६, ८, १० अन्वये दिनांक २५/१२/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून, आरोपी अटक असून मध्यवर्ती कारागृह येरवडा, पुणे येथे आहे. आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

कल्याण (जि.ठाणे) येथील फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन कोळसेवाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.११९०/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७(२) प्रमाणे नंतर कलम वाढ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १४०(१), ६५(२), ६६, १०३, २३८ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ कलम ४ व ६ अन्वये दिनांक २४/१२/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात दोन आरोपी अटक असून त्यापैकी एक महिला आरोपी आहे. सद्य:स्थितीत दोन्ही आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत. तसेच सदर गुन्ह्याचे न्यायालयीन कामकाजाकरीता शासनाने विशेष सरकारी वकील यांची नेमणूक केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथे बालकांवरील अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी जलदगती न्यायालय सुरू करण्याबाबत

**(१८) * ११५५ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाललैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात पीडीतेला जलद न्याय मिळवून देण्यासाठी तसेच आरोपींना कठोर शिक्षा होण्यासाठी पुणे येथे एकही स्वतंत्र जलदगती न्यायालय (फास्ट ट्रॅक कोर्ट) नसल्याने पाच हजारांहून अधिक दावे प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालकांवरील अत्याचाराचे खटले अन्य न्यायालयांमध्ये चालविण्यात येत असून, त्यामध्ये इतरही खटले घेण्यात येत असल्याने बालकांवरील अत्याचाराची न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पॉक्सो कायद्यांतर्गत दाखल खटल्यांच्या सुनावणीला विलंब झाल्यास साक्षीदार फितूर होण्याची शक्यता असते तसेच पीडीत चिमुकल्यांनाही घटना नेमकी लक्षात राहात नसल्यामुळे त्यांना न्याय देण्यासाठी ही प्रकरणे जलदगतीने निकाली काढणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने पुणे येथे स्वतंत्र जलदगती न्यायालय सुरु करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) National Mission for Safty of woman अंतर्गत महिलांवरील बलात्काराची व POCSO कायद्यांतर्गत बालकांवरील अत्याचाराची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या लक्षात घेता जलदगती न्यायालये कार्यान्वित करण्याबाबत मा.उच्च न्यायालयास यापुर्वी वेळोवेळी तसेच दिनांक ४/०२/२०२५ व दिनांक ११/०२/२०२५ रोजीच्या पत्रांन्वये कळविण्यात आले आहे.

सदर १३८ विशेष जलदगती न्यायालयांकरीता जिल्हा न्यायाधीशांची पदे भरण्याबाबतची भरती प्रक्रीया २०२३ व २०२४ प्रगतीपथावर असल्याचे मा.उच्च न्यायालयाने दिनांक २८/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात लव्ह जिहादच्या माध्यमातून महिलांची होणारी फसवणूक रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(१९) * १२१३ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिठानगर कोंढवा (पुणे) येथील निजाम शेख या व्यक्तीने शादी डॉट कॉमच्या माध्यमातून २५ पेक्षा अधिक घटस्फोटीत, विधवा महिलांची फसवणूक केल्याची बाब माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात लव्ह जिहादच्या मानसिकतेतून अल्पवयीन मुलींची क्रुर हत्या केल्याबाबतची अनेक प्रकरणे यापूर्वी निदर्शनास आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लव्ह जिहादच्या माध्यमातून लहान मुली, महिला यांची होणारी फसवणूक व शोषण रोखण्याकरीता शासनाने उत्तर प्रदेश सरकारच्या धर्तीवर कठोर कायदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) लव्ह जिहाद व फसवणूक करुन किंवा बलपूर्वक केलेले धर्मांतरण रोखण्याच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींचा अभ्यास करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली ०७ सदस्यीय विशेष समिती शासनाच्या दिनांक १४/०२/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विलेपार्ले (मुंबई) येथे दोन अल्पवयीन भावंडांना मारहाण करुन त्यांची धिंड काढल्याबाबत

**(२०) * १४०१ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विलेपार्ले (मुंबई) येथे कचरा वेचण्याचे काम करणाऱ्या ६० वर्षीय महिला दोन अल्पवयीन नातवांसोबत राहत असताना माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये सदर दोन भावांनी चोरी केल्याच्या संशयावरून तेथील स्थानिकांनी त्यांना बेदम मारहाण केल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चोरीच्या संशयातून अल्पवयीन भावांना लाथा बुक्यांनी मारहाण केली असून त्यांचे हात-पाय बांधून केस कापण्यात आले तसेच हात पाय बांधलेल्या अवस्थेत त्यांची धिंड काढून त्यांना बेदम मारहाण करण्यात आली आणि त्यांना रात्रभर बांधून ठेवून सकाळी कुणालाही काही सांगितल्यास पुन्हा मारहाण करण्याची धमकी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने दोन अल्पवयीन भावांसोबत अमानुष कृत्य करणाऱ्या आरोपींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशत: खरे आहे.

सदर घटना सप्टेंबर २०२४ मधील असून गुन्हा दिनांक २३/०९/२०२४ रोजी दाखल केला आहे.

(२) व (३) होय,

चोरीच्या संशयातुन बळितांना मारहाण करुन पुन्हा मारहाण करण्याची धमकी दिली आहे. बळितांना क्रुर वागणुक देवून त्यांचे मोबाईलमध्ये काढलेले व्हिडिओ फेसबुक वर अपलोड करुन व्हायरल केल्याचे चौकशीत आढळून आले आहे.

सदर प्रकरणी जुहू पोलीस ठाणे, मुंबई येथे दिनांक २३/०९/२०२४ रोजी गु.र.क्र.८९१/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १२७ (२), ११५(२), ३५२, ३५१ (२), ३५६ (२) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६७ सह बाल न्याय अधिनियम कलम ७५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. व सदर प्रकरणी ४ आरोपी अटक करण्यात आलेले आहे. आरोपींना जामिनावर मुक्त करण्यात आले आहे. तपासाअंती आरोपी विरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्याची तजवीज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व दुचाकी व चार चाकी वाहनांसाठी हाय सिक्युरिटी नंबर प्लेट लावण्याची सक्ती करण्यात आल्याबद्दल

**(२१)** * **१८३७ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुचाकी व चार चाकीच्या सर्व प्रकारच्या वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट लावण्याची सक्ती करण्यात आली असून सदरचे कंत्राट देताना कंपन्यांना लाभ होईल अशा प्रकारच्या अटी घालण्यात आल्याने सदर कंत्राटाची चौकशी करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली असल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेटसाठी इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील वाहनधारकांना २०० ते ३०० रुपये अधिक खर्च येणार असल्यामुळे वाहनधारकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रक्रियेसाठी वाहनांचे सर्व अभिलेख ऑनलाईन व डीजी लॉकर वर उपलब्ध असताना वाहनधारकांना सर्व मूळ कागदपत्रे व आरसी बुक सादर करण्याची जाचक अट घालण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कंत्राट वाटपाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने उपरोक्त मागण्यांबाबत तसेच वाहनधारकांना वाजवी दरात हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) याबाबत लोकप्रतिनिधी, नागरिक यांच्याकडून निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (एचएसआरपी) बाबतचे दर खालील प्रमाण आहेत:-

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | महाराष्ट्र राज्यातील एचएसआरपीचे दर (जीएसटी वगळून) |
|---|---|---|
| १. | दोन चाकी वाहने | रुपये ४५०.००/- |
| २. | तीन चाकी वाहने | रुपये ५००.००/- |
| ३. | चार चाकी वाहने | रुपये ७४५.००/- |
| ४. | जड वाहने | रुपये ७४५.००/- |

(३) उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (एचएसआरपी) बाबतची नोंदणी प्रक्रिया ही ऑनलाईन पोर्टलद्वारे करण्यात येत आहे. वाहनाची पडताळणी करण्याच्या अनुषंगाने वाहनाचा इंजिन नंबर आणि चॅसिस नंबर वाहनधारकाकडे असणे आवश्यक आहे.

(४) व (५) उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (एचएसआरपी) बसविण्यासाठी घटकांची निवड करण्याबाबतच्या प्रक्रियेच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधी, नागरिक यांच्याकडून निवेदने प्राप्त झाली आहेत.

उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (एचएसआरपी) बसविण्यासाठी निवड करण्यात आलेल्या ३ घटकांना परिवहन आयुक्त यांच्याकडून उद्देशिय पत्र (एलओआय) देण्यात आले असून सदर कंपन्यांसमवेत करार करण्यात आला आहे. तसेच याबाबतची मानक कार्यप्रणाली (एसओपी) देखील निर्गमित करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.